**मे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पटवर्धन हायस्कूल, सिताबर्डी, नागपूर-४४०००१ यांनी भंडारा ते गडचिरोली प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज-II अंतर्गत नागपूर गोंदिया द्रुतगती महामार्गाच्या सावरखेडा इंटरचेजपासून ते गाडेगाव येथील रायपूरकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग एनएच-५३ (बी) पर्यंत (Ch ०.००० ते Ch २४.७०६) आणि सावरखेडा-गाडेगाव वरील बोरगाव इंटरचेंजवरून (Ch ०.००० ते Ch ६९.५३६) एनएच-३५३ (डी) चरील किन्ही गावाला जोडण्याबाबतच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १७/०६/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | राजीव गांधी सांस्कृतिक सभागृह, ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. |

**प्रस्तावना:-**

मे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पटवर्धन हायस्कुल, सिताबर्डी, नागपूर-४४०००१ यांनी भंडारा ते गडचिरोली प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज-II अंतर्गत नागपूर गोंदिया द्रुतगती महामार्गाच्या सावरखेडा इंटरचेजपासून ते गाडेगाव येथील रायपूरकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग एनएच-५३ (बी) पर्यंत (Ch ०.००० ते Ch २४.७०६) आणि सावरखेडा-गाडेगाव वरील बोरगाव इंटरचेंजवरून (Ch ०.००० ते Ch ६९.५३६) एनएच-३५३ (डी) चरील किन्ही गावाला जोडण्याबाबतच्या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजी मान्यता दिलेली होती व त्यानंतर सुधारित टीओआर (TOR) दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी मान्यता देण्यात आली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-७ (f) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पटवर्धन हायस्कूल, सिताबर्डी, नागपूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०१/०४/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १७ जून, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक १६/०५/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, व्हीसीए समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१०. नगर परिषद कार्यालय, ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर..
११. गट-ग्रामपंचायत कार्यालय, बेलगाव (जानी) (तपाळ व बेळगाव जानी), ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, दिघोरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, नान्होरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, नांदगाव जानी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१५. गट-ग्राम पंचायत कार्यालय, पिंपळगाव (खाम तळोधी व पिंपळगाव), ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, सोंद्री, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, सुरबोडी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१८. ग्रामपंचायत कार्यालय, नवेगाव मक्ता, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
१९. ग्रामपंचायत कार्यालय, झिलबोडी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
२०. ग्रामपंचायत कार्यालय, बोरगाव, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
२१. ग्रामपंचायत कार्यालय, उदापूर, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

२२. ग्रामपंचायत कार्यालय, पारडगाव, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
२३. ग्रामपंचायत कार्यालय, बेटाळा, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
२४. ग्रामपंचायत कार्यालय, किन्ही, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
२५. ग्रामपंचायत कार्यालय रणमोचन, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.
२६. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २६ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३४५/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५०५२६-एफटीएस-००७६ दिनांक २६/०५/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ०१ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. नितीन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन

- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. दिपक भारतसिंग दिक्षीत, अध्यक्ष, प्रकृती फाऊंडेशन, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ईआयए अहवालामध्ये साहित्यचौरी तपासणीचा अहवाल जोडलेला नाही. या बाबत सल्लागाराने उत्तर द्यावे. तुम्ही थेट प्रकल्प सल्लागार आहात का? की अप्रत्यक्ष सल्लागार आहात? कारण ईआयए अहवालात दोन वेगवेगळ्या पर्यावरण सल्लागारांचे नावे नमूद आहेत. कृपया ईआयए अधिसूचना २००६ चा असा कोणता संदर्भ आहे की साहित्यचौरी तपासणीचा अहवाल केवळ अंतिम ईआयए अहवालासोबतच जोडायचा असतो, हे स्पष्ट करावे. जर सार्वजनिक सुनावणी ही जनतेशी सल्लामसलत करण्यासाठी घेतली जाते, तर मग साहित्यचौरी तपासणी अहवाल ईआयए अहवालासोबत का जोडलेला नाही? या अहवालाची खरीपणा काय आहे? तुम्ही कुठून तरी ईआयए अहवाल कॉपी करून तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) व जनतेसमोर सादर केलेला आहात. जर हा अहवाल खरा असेल, तर साहित्यचौरी तपासणी अहवाल जोडायला हवा होता. सल्लागार चुकीचा अहवाल सादर करून जनतेला व प्रशासनाला फसवत आहे. म्हणून, साहित्यचौरी तपासणीचा अहवाल सादर करावा अशी विनंती आहे. तज्ञ समितीच्या सदस्यांची यादीही ईआयए अहवालात जोडली गेली पाहिजे ज्यामध्ये त्यांची नावे, संपर्क क्रमांक व सह्या असणे आवश्यक आहे, जे ईआयए अधिसूचना, २००६ व त्यातील सुधारणा नुसार बंधनकारक आहे. तुम्ही जे सर्वेक्षण केले त्याचे भू-टॅग केलेले छायाचित्रे देखील | पर्यावरण सल्लागारांनी माहिती दिली की, सार्वजनिक सुनावणी घेण्यासाठी draft EIA (पर्यावरण प्रभाव मूल्यांकन) अहवाल सादर करण्यात आला आहे. सार्वजनिक सुनावणीनंतर, अंतिम EIA अहवाल सादर करताना साहित्यचौरी तपासणी अहवाल (Plagiarism Report) पर्यावरण मूल्यांकन समितीकडे सादर केला जाईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण सार्वजनिक सुनावणी समिती यांनी सांगितले की, आपले आक्षेप व सूचना कार्यवाहीमध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत. कृपया आपले आक्षेप व सूचना लेखी स्वरूपात सादर कराव्यात.<br><br>श्री. निशिकांत सुक्के, अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवृत्त) यांनी सांगितले की, कृपया आपल्या सूचना व आक्षेप सार्वजनिक सुनावणीदरम्यान मांडावेत. त्या कार्यवाहीमध्ये समाविष्ट करण्यात येतील व त्यानुसार अनुपालन अहवाल पर्यावरण मूल्यांकन समितीकडे सादर केला जाईल.<br><br>पर्यावरण सल्लागारांनी सांगितले की, आमच्याकडे तज्ञांची नावे व संपर्क क्रमांक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जोडायला हवे होते. ती draft EIA अहवालात असणे आवश्यक होते. म्हणूनच, हा अहवाल बनावट आहे व त्या आधारे घेतलेली सार्वजनिक सुनावणी बेकायदेशीर आहे. सल्लागार व प्रकल्प प्रस्थापकाविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवला जाऊ शकतो. ईटीओआरच्या अटी क्र.१ नुसार, रस्ता पूरप्रवण क्षेत्रातून जातो. संबंधित अधिसूचना चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केलेली आहे. दोन दिवसांपूर्वी पुण्यात इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला. मा. मुख्यमंत्री यांनी सांगितले की महाराष्ट्रात अशा सुमारे ५०० ठिकाणी पूरप्रवण क्षेत्रे आहेत. हा रस्ता त्यापैकी एका ठिकाणावरून जातो. जर त्या रस्त्यावरून लोक, विद्यार्थी, शेतकरी प्रवास करत असताना अचानक ढगफुटी झाली, तर रस्ता कोसळण्याची शक्यता आहे. यासंदर्भातील कोणताही धोका विश्लेषणाचा अहवाल ईआयए मध्ये जोडलेला नाही. हा सर्वात गंभीर मुद्दा आहे. MPCB च्या प्रादेशिक अधिकाऱ्याने हे धोका विश्लेषण वरिष्ठ अधिकाऱ्यांना व मा. अध्यक्षांना कळवायला हवे होते. प्रकल्प प्रस्थापकाने ३ महिने आधी MPCB कडे अहवाल सादर केलेला आहे, मग MPCB ने तो तपासला का नाही? प्रकल्प प्रस्थापक व सल्लागार यांच्याविरोधात फसवणूक व चुकीचा अहवाल सादर केल्याबद्दल गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. प्रकल्प प्रस्थापकाने ९३ किमी च्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी २३०० मीटर लांबीची भिंत उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. जर त्या भागात पाऊस किंवा ढगफुटी झाली तर त्या २.५ किमी क्षेत्रातील वन्यजीवांचा हालचाल मार्ग बंद होईल. या संदर्भातील कोणतेही जोखीम विश्लेषण अहवालात समाविष्ट केलेले नाही. अशा प्रकारे बेकायदेशीर विकास केला जात आहे. वन्यजीवांचा मार्ग बंद झाल्यास त्यांची स्थलांतर क्षमता धोक्यात येईल. हा अहवाल चुकीचा आहे. वाहतुकीचे चार प्रकार आहेत — हवाई, रेल्वे, मोटार व मानवी वाहतूक. यातील सर्वात सुरक्षित वाहतूक म्हणजे हवाई, त्यानंतर रेल्वे, मग रस्ते आणि शेवटी पायदळ वाहतूक जी धोकादायक मानली जाते. गुजरातमध्ये नुकतीच विमान दुर्घटना घडली ती केवळ ०.००१% चूक आहे. म्हणजेच, सर्वात सुरक्षित वाहतूक प्रकारात देखील अपघात घडू शकतात. त्यामुळे प्रकल्प प्रस्थापक व सल्लागार जनतेच्या व प्राण्यांच्या जिवाशी खेळत आहेत. मानव व वन्यजीव संघर्ष याबाबत कोणताही अहवाल जोडलेला नाही. वन विभागाच्या | उपलब्ध आहेत, ते लवकरच तुम्हाला दिले जातील. मात्र, त्यांचा समावेश EIA अहवालात केलेला नाही. भू-टॅग केलेली छायाचित्रे आमच्याकडे उपलब्ध आहेत, पण ती देखील अहवालात संलग्न केलेली नाहीत.<br><br>प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, कृपया आपले आक्षेप नोंदवावेत. ते सार्वजनिक सुनावणीच्या कार्यवाहीत समाविष्ट केले जातील. संबंधित चुका वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दुरुस्त केल्या जातील.<br><br>पर्यावरण सल्लागारांनी सांगितले की, प्रस्तावित सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवेच्या तिसऱ्या विभागात किंही (चेनज ६९+५०) ते मध्याटुकूम (चेनज ११६+०००) दरम्यान, जिथे सध्याचा HS ३५३D रस्ता विस्तारीत करण्याचा प्रस्ताव आहे, तेथे प्राण्यांच्या हालचालीसाठी पुरेशी उन्नत मार्गिका/अंडरपासची तरतूद करण्यात येईल. सुरुवातीचा प्रस्ताव केवळ गडचिरोलीपर्यंत होता. त्यानंतर हा प्रस्ताव ७९ यादीपर्यंत वाढविण्यात आला, मात्र त्याचा समावेश या प्रकल्पात केलेला नाही. Terms of Reference मध्ये सुधारणा करण्यात आली असून आता काम केवळ किंहीपर्यंतच केले जाणार आहे. त्यामुळे तो भाग लागू होणार नाही. रस्त्याची लांबी केवळ ६९.५ किमी इतकीच असेल. या पुढे MSRDC द्वारे रस्त्याचे काम केले जाणार नाही. किंही हे चंद्रपूर जिल्ह्यात येते. Draft EIA अहवालासोबत संलग्निका जोडलेल्या नाहीत, पण आमच्याकडे ते अहवाल उपलब्ध आहेत. आम्ही जोखीम विश्लेषण अभ्यासही केला असून त्याचा अहवाल संलग्निकेत नमूद केलेला आहे. Draft EIA अहवाल EIA अधिसूचना, २००६ नुसार तयार करण्यात आला आहे. सर्व संलग्निका आम्ही MPCB कडे सादर करू. आम्ही तुम्हाला अहवाल उपलब्ध करून देऊ. परंतु, आपण आपले आक्षेप व सूचना सादर कराव्यात, जे कार्यवाहीत व अंतिम EIA अहवालात समाविष्ट केले जातील. |

| | | |
|---|---|---|
| | नोंदींनुसार, चंद्रपूर जिल्ह्यात अशा संघर्षाचे अनेक प्रकार घडले आहेत व काहींमध्ये नागरिकांचा मृत्यू झाला आहे. वन्यजीव एकाच ठिकाणी राहत नाही, ते फिरते असतात. कोणतेही धोका विश्लेषण अहवालात समाविष्ट नाही. TOR च्या अट क्र.२ मध्ये काय नमूद केले आहे? प्रकल्प प्रस्थापकाने काय उत्तर दिले? त्यांनी फक्त ६९.५ किमी पर्यंतच अंडरपास प्रस्तावित केला आहे. परंतु अहवाल ९३ किमी साठी तयार केला गेला आहे आणि केवळ २ अंडरपास दर्शविले आहेत. MSRDC ने वन्यजीवांसाठी अंडरपास तयार करताना मार्गदर्शक तत्वे पाळलेली नाहीत. समितीने याबाबत सल्लागाराकडून माहिती घ्यावी कारण वन्यजीवांची चळवळ त्या भागात आढळते. तसंच मानवी व वन्यजीव संघर्षाबाबत भरपाईसाठी अर्ज प्रशासनाकडे सादर केले गेले आहेत. कोणतीही शमन योजना अहवालात दिलेली नाही. गवत व तण यासंदर्भातील अहवालही संलग्न नाही. तो सादर करावा म्हणजे चर्चा करता येईल. आम्हाला आमचे तज्ञ मत मांडायचे आहे, म्हणून सर्व अहवाल MPCB ने मागवावे. TOR च्या अट क्र.८ नुसार शमन उपाय योजना सादर करणे अपेक्षित होते. १० किमी त्रिज्येतील अभ्यास क्षेत्राचा नकाशा नमूद आहे, परंतु त्यासंबंधित विहीर, वावडी, नदी, नाले, वॉटरशेड विकास योजनेसह शमन उपाय योजना जोडलेली नाही. यासाठी फक्त ३७ लाख रुपयांची तरतूद केली आहे जी अपुरी आहे. सल्लागार व प्रकल्प प्रस्थापक जनतेला दिशाभूल करत आहेत. रस्त्याच्या कडेला पाणीसाठा करण्याची योजना देखील नमूद केलेली नाही. त्यांनी कोणत्या खात्यांशी संपर्क केला हे ही दिलेले नाही. आम्ही कायदेशीररित्या या अहवालाविरोधात अर्ज करणार आहोत. TOR च्या अट क्र.९ नुसार वाहतूक अभ्यास अहवाल, रस्ता सुरक्षा अहवाल सादर करणे आवश्यक होते. ते देखील सादर केलेले नाहीत. जर हे अहवाल संलग्न नाहीत, तर आम्ही सतत विरोध करत राहू. TOR च्या अट क्र.१२ नुसार प्रत्येक ५०० मीटर अंतरावर पर्जन्य जलसंधारणासाठी खड्डे तयार केले गेले आहेत. परंतु त्यांचे डिझाईन जोडलेले नाही. केंद्रीय भूमिगत जल प्राधिकरणाकडून अहवाल घ्यायला हवा. भविष्यात ५० खड्डे बंद पडले, तर प्रकल्प प्रस्थापकांना ते पुन्हा उभारावे लागतील. त्यांनी फक्त ३७ लाखांची तरतूद केली आहे, जी अपुरी आहे. अट क्र.२ नुसार वन्यजीव | मा. अध्यक्ष, पर्यावरण सार्वजनिक सुनावणी समिती यांनी सांगितले की, अनुपलब्ध अहवालासंबंधीचे मुद्दे नोंदवले जातील. कृपया पुढील प्रश्नांकडे जावे.<br><br>पर्यावरण सल्लागारांनी सांगितले की, आम्ही सार्वजनिक सुनावणीतील आक्षेप व सूचना कार्यवाहीत समाविष्ट केल्या आहेत. सध्या सादर केलेला हा draft EIA अहवाल MPCB कडे सादर करण्यात आलेला आहे. जनतेने उपस्थित केलेल्या प्रश्नांची अनुपालन अहवालात पूर्तता अंतिम EIA अहवालात MOEFCC च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केली जाईल. ब्रम्हपुरी तालुक्यातील रस्त्याच्या बांधकाम क्षेत्रात २३०० मीटरची भिंत येत नाही. ही भिंत सावरखेडा ते गडेगाव (भाग-१) दरम्यानच्या क्षेत्रात येते. ही भिंत पाण्याखाली जाणाऱ्या क्षेत्रात येते व ती अभियांत्रिकी निकषांनुसार संरक्षणात्मक काम मानले गेले आहे. वन्यजीव शमन उपाययोजनांसाठी MSRDC ने भारतीय वन्यजीव संस्थेची मदत घेतली आहे. सर्व शमन उपाय अंतिम EIA अहवालात समाविष्ट करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | हालचालीचा मुद्दा जर त्यांनी मांडला असता, तर प्रकल्पास मंजुरी मिळाली नसती. सल्लागार NABL साठी सर्व कार्यक्षेत्रांमध्ये मान्यता प्राप्त आहे का? त्यांच्याकडे सर्व कार्यक्षेत्रांमध्ये NABL मान्यता नाही, त्यामुळे अहवाल बनावट आहे. सल्लागाराविरुद्ध गुन्हा दाखल करावा. पान क्र.१३२ वर टेलपठारी गावातील पाण्याबाबत असा उल्लेख आहे की, ते गंगाजळापेक्षा शुद्ध आहे. हे कसे शक्य आहे? भाग ४.८ मध्ये म्हटले आहे की, हे पाणी आसुत पाण्यापेक्षा देखील शुद्ध आहे. जर हे पाणी शासकीय पुरवठ्याच्या पाण्यापेक्षा शुद्ध आहे असे म्हटले असेल, तर तो दुसऱ्या अहवालाचा कॉपीपेस्ट आहे. अहवाल खोटा आहे. ४.१.२ मध्ये हवामान गुणवत्ता सॉफ्टवेअरची परवानगीपत्र दाखवली पाहिजे. Consult Pro हे सॉफ्टवेअर या भागासाठी योग्य नाही. ते परिसरातील जटिलता दर्शवू शकत नाही. म्हणून हा अहवालही चुकीचा आहे. हा अहवाल कायदेशीरपणे पुन्हा तयार करावा आणि सार्वजनिक सुनावणी नव्याने घेण्यात यावी | |

२) **डॉ. सत्यप्रकाश मेहरा, पर्यावरणवादी, प्रकृती फाऊंडेशन, चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मला पर्यावरण सल्लागारांनी केलेल्या मूल्यमापनाविषयी अधिक माहिती नाही. मी केवळ काही तथ्ये "प्रकृती फाउंडेशन"च्या वतीने ईआयए अहवालातून मांडू इच्छितो/इच्छिते, जी लक्षात घेतली गेली पाहिजेत. जैवविविधतेच्या मूल्यमापनासाठी सल्लागाराने कोणता आधार घेतला, हे मला माहित नाही. वन्यजीव मूल्यांकन २०२३ साली केले आहे. पण वन्यजीव एका ठिकाणी दिसतोच असे नाही. वन्यजीव कधीही एका ठिकाणी राहत नाहीत. सल्लागाराने केलेले मूल्यांकन वन्यजीवांच्या प्रजाती नोंदविल्याशिवाय केले आहे. जे काही अभ्यास केले गेले आहेत, ते चुकीचे आहेत. आपल्याला अत्यंत सोप्या भाषेत आपल्या अडचणी, शंका, सूचना व आक्षेप नोंदविण्यास सांगितले गेले. ही एक औपचारिक प्रक्रिया पूर्ण केली जाईल, पण ती धोरणात्मक सुधारणांमध्ये समाविष्ट केली जाईल की नाही हे मला माहीत नाही. पण खरी गोष्ट म्हणजे, ही मते विचारात घेतली जातील की नाही? पुढील सार्वजनिक सुनावणीत त्यात सुधारणा केली | पर्यावरण सल्लागारांनी सांगितले की, आम्ही सार्वजनिक सुनावणीतील आक्षेप व सूचना कार्यवाहीत समाविष्ट केल्या आहेत. सध्या सादर केलेला हा draft EIA अहवाल MPCB कडे सादर करण्यात आलेला आहे. जनतेने उपस्थित केलेल्या प्रश्नांची अनुपालन अहवालात पूर्तता अंतिम EIA अहवालात MOEFCC च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केली जाईल. ब्रम्हपुरी तालुक्यातील रस्त्याच्या बांधकाम क्षेत्रात २३०० मीटरची भिंत येत नाही. ही भिंत सावखेडा ते गडेगाव (भाग-१) दरम्यानच्या क्षेत्रात येते. ही भिंत पाण्याखाली जाणाऱ्या क्षेत्रात येते व ती अभियांत्रिकी निकषांनुसार संरक्षणात्मक काम मानले गेले आहे. वन्यजीव शमन उपाययोजनांसाठी MSRDC ने भारतीय वन्यजीव संस्थेची मदत घेतली आहे. सर्व शमन उपाय |

| | | |
|---|---|---|
| | जाईल की नाही, हाच खरा प्रश्न आहे. रस्त्याच्या बांधकाम क्षेत्रात १०० ते २०० प्रजाती आहेत असे नमूद करण्यात आले आहे, परंतु वनस्पतींची यादी दिलेली नाही. यात काही जागतिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या प्रजाती आहेत. त्यांनी वृक्षारोपणासाठी IRC नियमांचे पालन केले आहे असे म्हटले आहे. महामार्ग धोरण मार्गदर्शक तत्त्वे, २०१५ नुसार काही झाडे लावली जातील असे नमूद केले आहे. काही प्रजाती त्या भागात सर्वत्र आढळतात. परंतु सल्लागारांनी विचार करणे आवश्यक आहे की अशा प्रजाती चंद्रपूरसारख्या भागासाठी खरोखरच उपयुक्त आहेत का? तुम्ही ज्या झाडांची पुनर्रचना करत आहात ती अनेक वर्षांपासून त्या ठिकाणी आहेत, त्यांचा नायनाट का केला जात आहे? महामार्ग मार्गदर्शक तत्त्वांनुसार मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाची कोणती तरतूद आहे का? जर नाही, तर प्रकल्प प्रस्थापकांनी प्रयोगात्मक स्वरूपात वृक्षारोपण करावे. त्या सहा प्रजाती ज्या जागतिक महत्त्वाच्या आहेत, त्या नष्ट केल्या जाणार आहेत. नीम व बाभळाची झाडे लावू नयेत, अशी विनंती आहे. कारण तुमच्याकडे कार्बन क्रेडिट धोरण नाही, जे केंद्र सरकार प्रोत्साहन देत आहे. ही माझी सर्वात वाईट सार्वजनिक सुनावणीची अनुभव आहे आणि मी ती मा. पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून देईन. एक पर्यावरणप्रेमी म्हणून, आपण या प्रकरणाकडे मॉडेल म्हणून पाहिले पाहिजे. ईआयए अहवालात नमूद प्राण्यांच्या नावांवर चर्चा करण्याची माझी इच्छा आहे. जैवविविधतेविषयी घेतलेल्या सर्वेक्षणावर माझा प्रश्न आहे. अनेक प्रस्थापित वन्य प्रजातींचा उल्लेख प्रकल्प प्रस्थापकाने केलेला नाही. माझ्याकडे अशा प्रजातींचे छायाचित्रे आहेत. तरीही प्रकल्प प्रस्थापक अंतिम अहवालात यांचा समावेश करणार नाहीत. आणि सार्वजनिक सुनावणीनंतर आम्हाला अहवाल उपलब्ध होणार नाही. अहवालात काही पक्ष्यांच्या स्थानिक प्रजातींचा उल्लेख आहे, ज्या वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत येतात. पण जे झाडे लावले जाणार आहेत, ती त्या भागाचा परिसंस्थेचा समतोल राखू शकतील का? मी त्या भागातील सर्व महत्त्वाच्या फुलपाखरू प्रजाती पाहिल्या आहेत, ज्या त्या परिसंस्थेसाठी महत्त्वाच्या आहेत. जर मी चुकीचा असेन, तर वनविभाग तसर रेशीम उत्पादनासाठी उपजीविका पुरवते. तसर रेशीम जंगलावर अवलंबून असते. या | अंतिम EIA अहवालात समाविष्ट करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पामुळे अनेक प्रजाती नष्ट होतील. प्रकल्प प्रस्थापकांकडे झाडांच्या पुनर्लागवडीसाठी कोणतीही धोरण नाही. यासंदर्भात आम्ही लिखित स्वरूपात निवेदन दिले आहे. श्री. दीक्षित यांनी यासंदर्भात कठोर भाषेत बोलले, पण मी सौम्यपणे बोलतो/बोलते. तुम्हाला कायदेशीर मार्गाने हे काम करावे लागेल, कारण आजकाल लोक जागरूक झाले आहेत. जर समित्या, पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रस्थापक लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या मुद्द्यांची दखल घेत नसतील, तर अशा सार्वजनिक सुनावण्या घेण्यात येऊ नयेत. स्थानिक लोकांना जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करणे शक्य नसते, पण मला शक्य आहे. हेही सत्य आहे की, तुम्ही तुमच्या व्यस्त वेळापत्रकामुळे स्थानिक लोकांचे प्रश्न ऐकून घेऊ शकणार नाही आणि त्यांना दुसऱ्या दिवशी येण्यास सांगता. म्हणूनच, सार्वजनिक सुनावणी करताना सर्व अहवाल व कागदपत्रांचा समावेश असला पाहिजे. श्री. दीक्षित यांनी मांडलेले काही तांत्रिक मुद्दे स्वीकारणे कठीण आहे. पण याचा अर्थ असा नाही की ईआयए अहवाल फेटाळून द्यावा. आपल्याला यावर विचार करावा लागेल. सल्लागारांनी त्यांच्या ईआयए अहवालामध्ये सर्व प्रकारचे अहवाल व प्रमाणपत्रे समाविष्ट करावीत, यासाठी तुम्ही त्यांना कठोर सूचना द्याव्यात. पर्यावरण सल्लागाराने जैवविविधतेसाठी ०.८ गुण दिले आहेत. जैवविविधतेसाठी ० ते १ या दरम्यान गुण दिले जातात. ०.८ गुण हे प्रकल्प प्रस्थापकांसाठी उपयुक्त असतील का? मी सार्वजनिक सुनावणीत सर्व प्रकारच्या परस्परावलंबी प्रजातींबद्दल बोलत आहे. ही सुनावणी केवळ एक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी आयोजित केलेली आहे. मला माहिती आहे की अनेक अडचणी आहेत, पण आपले अस्तित्व या गोष्टींवर अवलंबून आहे. मी प्रशासनाला विनंती करतो की श्री. दीक्षित यांच्यासारखे लोक प्रकल्पांच्या बाजूने बोलतील आणि ईआयए अहवालात व धोरणांमध्ये सुधारणा सुचवतील, यासाठी कठोर मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात. मी सल्लागार व प्रशासनाला सहकार्य करण्यास तयार आहे. विदर्भ विभागात अनेक प्रस्तावित प्रकल्प आहेत, जे त्या भागातील जैवविविधता व परिसंस्थेवर परिणाम करणार आहेत. | |

**३) श्री. सागर सुरेश आमने, ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेतीचे क्षेत्र गट क्रमांक १५० आणि १५१ मध्ये आहे. गट क्रमांक १५० हा ७/१२ उतान्यावर नमूद आहे, परंतु नकाशानुसार तो १५१ आहे. मला साळोखा योजनेनुसार महामार्गाचा प्रकल्प असल्याचे कळाल्यानंतर मी दिनांक १२/१०/२०२३ रोजी अपील दाखल केले आहे. परंतु आजपर्यंत मला दर व इतर बाबतीत कोणतीही लेखी माहिती मिळालेली नाही. मी संबंधित कागदपत्रे समितीच्या निदर्शनास आणून दिली आहेत. तसेच मी जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण व्यस्त वेळापत्रकामुळे संबंधित अधिकाऱ्यांची भेट होऊ शकली नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०१ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(तानाजी यादव)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(डॉ. नितीन रा. व्यवहारे)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर. |